Government of Maharashtra

MAGNETIC MAHARASHTRA

CONVERGENCE 2018

Global Investors Summit - Feb 18-20

# महाराष्ट्राचे लॉजिस्टीक पार्क धोरण

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

उद्योग विभाग

Government of Maharashtra

# महाराष्ट्राचे लॉजिस्टीक पार्क धोरण - 2018

## प्रस्तावना :

आज लॉजिस्टीकला आंतरराष्ट्रीय सेवेचा दर्जा मिळाला असून जागतिक व्यापाराद्वारे देशाला परकीय चलन मिळवून देण्याची क्षमता त्यामध्ये निर्माण झाली आहे. आजची वेगवान आर्थिक परिस्थिती, जागतिकीकरण व लॉजिस्टीकमध्ये होणाऱ्या वेगवान प्रगतीचा विचार करता, लॉजिस्टीक हे उद्योगातील एका संकल्पनेत रुपांतरीत झाले आहे. लॉजिस्टीक हे देशाच्या आर्थिक विकासात कळीची भूमिका बजावत आहे.

भारतामध्ये वस्तू व सेवा करासारख्या मुलभूत सुधारणा सुरु झाल्या असून बड्या उद्योगांच्या वितरण व्यवस्थेमध्ये सुद्धा अमुलाग्र बदल होऊन त्यांना भौगोलिक वितरण व्युहरचनेचा आधार घ्यावा लागणार आहे. तसेच माननीय पंतप्रधानांच्या मेक इन इंडिया ह्या महत्वाकांक्षी योजनेच्या यशस्वितेसाठी देशाला आपल्या लॉजिस्टीकमध्ये अद्ययावतता आणावी लागणार आहे. जागतिक बँकेच्या लॉजिस्टीकमधील कामगिरीचा निर्देशांक मानला जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय पुरवठा कार्यक्षमतेच्या 2016 वर्षाच्या द्वैवार्षिक आढाव्यात भारताचा 35 वा क्रमांक असून देशातील लॉजिस्टीक बाबतच्या मुलभूत सोयी सुविधांच्या विषयी काळजी वाटावी अशी परिस्थिती आहे.

ह्या क्षेत्राला जागेची उपलब्धता, कुशल मनुष्यबळाचा अभाव, रस्ते, रेल्वे, बंदरे, विमानतळ आणि अन्य अनेक मुलभूत संरचनेचा अभाव इत्यादी समस्यांनी ग्रासले आहे. हे क्षेत्र बहुतांशी असंघटीत असून परंपरागत गोदामांचे आकार हे 10000 वर्गफुटापेक्षा कमी व उंची 3 ते 4 मीटर असल्यामुळे एकाच उपयोगकर्त्याद्वारे त्याचा उपयोग होऊ शकतो. ह्यापैकी बहुतांश गोदामांमध्ये प्रमाणित गुणवत्तेचा व पायाभूत विनिर्देशनाचा अभाव, शहराच्या मध्यभागी व उद्योगांच्या उत्पादन होणाऱ्या जागेजवळ नसणे आहेत अशा इतर समस्या सुद्धा आहेत. 50000 वर्गफूट पेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या, अत्याधुनिक मांडणी प्रणाली, अटकपट्ट्या व प्रमाणीकरण यांनी युक्त, गळती नसलेले, 24 तास सुरक्षा व्यवस्था असलेली, आधुनिक पायाभूत सोयीसुविधा व बहुविध उपयोग करता येणारी, इष्टतम ठिकाणी असणारी, स्वयंचलन व माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून चोरी व नुकसानीस प्रतिबंध करणारी थोडी गोदामे आहेत.

महाराष्ट्र हे देशातील सर्वात जास्त औद्योगिकीकरण झालेले व ग्राहक असलेले राज्य असल्यामुळे राज्याच्या सर्वसमावेशक आर्थिक प्रगतीसाठी वरील समस्यांकडे त्वरित लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. ह्या धोरणामध्ये लॉजिस्टीक क्षेत्रापुढील समस्या निवारण करण्याचा प्रयत्न केला आहे.

उपरोक्त प्रमाणे राज्याच्या स्वतंत्र लॉजिस्टिक पार्क धोरणाची आवश्यकता विचारात घेऊन राज्याचे स्वतंत्र लॉजिस्टिक पार्क धोरणाचे प्रारुप तयार करण्यात आले आहे.

## 2. धोरणाचे उद्देश:

A. महाराष्ट्राला जागतिक पुरवठा साखळीचा एक भाग बनविणे

B. पारंपारिक गोदामांना अद्ययावतता आणून त्याचे पूर्णतः एकीकृत असलेल्या व मूल्यवर्धित लॉजिस्टीक करणाऱ्या सेवेत मध्ये रुपांतर करणे

C. कार्यक्षमतेत सुधारणा व लॉजिस्टीक खर्चात कपात

D. राज्यातील लॉजिस्टीक क्षेत्रातील एकूणच पायाभूत सुविधा सुधारून शेवटच्या टोकापर्यंत जोडून घेणे

## 3. धोरणाचे लक्ष्य :

A. राज्यात लॉजिस्टीक समूह निर्माण करणे व किमान 25 पूर्णपणे एकीकृत बहुविध लॉजिस्टीक पार्क तयार करणे

B. किमान 100 लॉजिस्टीक पार्कचे प्रवर्तन करणे

## 4. लॉजिस्टीक पार्कच्या उभारणीकरिता पात्रता :

A. जमीन मालक अथवा त्यांनी नियुक्त केलेला विकासक अथवा कोणतेही कायदेशीर अस्तित्व असलेली कंपनी,

B. अथवा ज्याचेकडे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडील 30 वर्षाच्या भाडेपट्टयाचा कालावधी शिल्लक शिल्लक आहे असा भाडेपट्टाधारक हे लॉजिस्टीक पार्कच्या उभारणीसाठी पात्र राहतील.

## 5. लॉजिस्टीक पुरवठा पार्कमध्ये देता येणाऱ्या सेवा/उपक्रम :

ह्यामध्ये खालील सेवा/उपक्रमांचा समावेश असेल. (यादी दर्शक आहे)

### A. लॉजिस्टीक सेवा :

- मालाचे एकत्रीकरण/विलगीकरण
- विल्हेवारी, प्रतवारी, वेष्टन/पुनर्वेष्टन, मार्गण पट्टिका/खुणचिठ्ठी लावणे
- वितरण/ग्राहक वितरण
- माल व मालवाहू वाहनाच्या बहुविध प्रकारात अंतरण करणे
- खुली व बंद साठवणूक
- संक्रमण कालावधीसाठी साठवणूक करण्यास अनुकूल सभोवताल
- सीमा शुल्क विभागाशी संलग्न गोदाम
- मालवाहू वाहनाचे वाहनावळ भरणा करण्याचे स्थान
- मालवाहू वाहने ठेवण्यास जागा
- अर्धवट व पुर्णपणे तयार मालाच्या कार्यक्षम वितरण व चलनवलनासाठी माल हाताळणी उपकरणांची सुविधा.

### B. पायाभूत सुविधा:

- अंतर्गत रस्ते,
- विजेची जोडणी,
- संपर्काच्या सुविधा ,
- अंतर्गत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था,
- पाणी वितरण व आवर्धन सुविधा,
- मैला व जलनिस्सारण सुविधा,
- सांडपाणी प्रक्रिया व विल्हेवाट सुविधा,
- अग्निशमन सेवा,
- वाहनतळ

### C. व्यापारी व व्यावसायिक सुविधा

- वसतिगृह
- अतिथी गृह
- उपहारगृह
- वैद्यकीय केंद्र
- पेट्रोल पंप
- बँकिंग व वित्तीय सेवा
- कार्यालयीन जागा
- हॉटेल
- उपहारगृह
- रुग्णालय/ दवाखाना
- प्रशासकीय कार्यालय

D. **सामाईक सुविधा**

- वजन काटा
- कौशल्य विकसन केंद्र
- संगणक केंद्र
- उपकंत्राट विनिमय केंद्र
- कंटेनर वाहतूक स्थानक
- उत्पादन चाचणी केंद्र
- वाहने व पार्क मधील यंत्रसामुग्रीकरीता दुरुस्ती कार्यशाळा
- महाराष्ट्र शासनाचा उद्योग विभाग यामध्ये लॉजिस्टीक क्षेत्राच्या गरजांप्रमाणे अनुज्ञेय सेवा/उपक्रमांचा वेळोवेळी समावेश करेल.

## 6. लॉजिस्टीक पार्कच्या उभारणीची कार्यपध्दती :-

खाजगी जमीन मालक अथवा त्यांनी नियुक्त केलेला विकासक अथवा ज्या जमिनीच्या भाडेपट्ट्याची मुदत 30 वर्ष आहे अशा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भाडेपट्टाधारकांच्या अथवा लॉजिस्टीक प्रयोजनार्थ संयुक्त उपक्रमासाठी ज्या जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम 1961 अंतर्गत संपादीत केल्या असतील अशा जमिनींच्या संदर्भात अर्जदारने मागणी केल्यानंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून त्या क्षेत्राकरिता अधिसूचना विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन काढण्यात येईल. अशी सूचना निर्गमित केल्यानंतर संबंधित क्षेत्राच्या विकास योजनेत अथवा प्रादेशक योजनेत अन्य कोणत्याही तरतूदी असल्यास, तिच्यामध्ये आपोआप बदल होवून हे क्षेत्र लॉजिस्टीक पार्कच्या विकसनासाठी उपलब्ध होईल.

लॉजिस्टिक पार्कच्या उभारणी संदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 154 अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

## 7. लॉजिस्टीक पार्कस :-

### अ. एकात्मिक लॉजिस्टीक पार्क (Integrated Logistics Park)

किमान 5 एकर (पाच एकर) जमिनीवर पसरलेल्या व किमान 15 मीटर रुंदीच्या जाण्यायेण्याच्या रस्त्याने जोडले गेलेल्या जागेस एकात्मिक लॉजिस्टीक पार्क असे व्याख्यीत केले जाईल. एकात्मिक लॉजिस्टीक पार्क म्हणून अधिसूचित केलेल्या क्षेत्रफळापैकी किमान 70% हिस्सा हा परिच्छेद 5 (अ) मध्ये नमूद केलेल्या लॉजिस्टीक सेवा देण्यासाठी व उर्वरित 30% उपलब्ध क्षेत्रफळापर्यंतचा हिस्सा हा परिच्छेद 5 (क) व 5 (ड) मधील अनुज्ञेय व्यापारी/व्यावसायिक सेवा व सामाईक सुविधांसाठी वापरता येईल. 70% पेक्षा जास्त किमान क्षेत्रफळातील वाढ आपोआप अनुज्ञेय असेल (म्हणजेच 80:20, 90:10 परंतु 60:40 नव्हे) व त्यासाठी विभागाकडून वेगळ्या परवानगीची गरज असणार नाही. औद्योगिक क्षेत्रातील चटई क्षेत्र निर्देशांकाचे व्यापारी/व्यावसायिक सेवांच्या क्षेत्रफळात किंवा उलटपक्षी वहन अनुज्ञेय असणार नाही, पण औद्योगिक विभाग व व्यापारी/व्यावसायिक सेवा विभागात चटई क्षेत्र निर्देशांकाचे वेगवेगळे वहन अनुज्ञेय असेल

एकात्मिक लॉजिस्टीक पार्क हे परिच्छेद 5 (ब) मध्ये नमूद केल्यानुसारच्या किमान पायाभूत सुविधा पूरवेल. किमान बंधनकारक पायाभूत व सामाईक सुविधा खालीलप्रमाणे असतील

**पायाभूत सुविधा**

- अंतर्गत रस्ते
- विजेची जोडणी,
- संपर्काच्या सुविधा
- पाणी वितरण व आवर्धन सुविधा
- मैला व जलनिस्सारण सुविधा
- सांडपाणी प्रक्रिया व विल्हेवाट सुविधा
- अग्निशमन सेवा
- वाहनतळ

**सामाईक सुविधा**

- शयनागार
- उपहार गृह
- वैद्यकीय केंद्र
- वजन काटा

परिच्छेद 5(ब) मधील नमूद वाहनतळ व अन्य आवश्यक सुविधा ह्या चटई क्षेत्र निर्देशांक मुक्त असतील.

उद्योग संचालनालयाने इरादापत्र जारी केल्याच्या दिनांकापासून 5 वर्षांच्या कालावधीत अधिसूचित एकात्मिक लॉजिस्टीक पार्क विकसन पूर्ण होणे आवश्यक आहे. उद्योग संचालनालयाने इरादा पत्र जारी केल्याच्या दिनांकापासून 5 वर्षांच्या कालावधीत एकात्मिक लॉजिस्टीक पार्क म्हणून अधिसूचित झालेल्या क्षेत्राचे विकसन पूर्ण होणे आवश्यक आहे. सदर मुदतीत एकावेळी किमान वर्षभर अशी मुदतवाढ कमाल तीन वेळा गुणवत्तेच्या आधारावर देता येईल. सर्व एकात्मिक लॉजिस्टीक पार्कसाठी उद्योग संचालनालय हे नोंदणी अभिकरण असतील. इरादापत्र व नोंदणीसाठी अवलंबली जाणारी प्रक्रिया ही एकात्मिक औद्योगिक क्षेत्राअंतर्गत अनुसरलेल्या प्रक्रियेच्या अनुरुप असेल. एकात्मिक लॉजिस्टीक पार्काच्या विकासकाला पायाभूत सुविधा विकसित करून त्यांची देखभाल करावी लागेल. विकासकाने अशा सुविधा भाड्याने/भाडेपट्ट्याने घ्यावेत अथवा द्यावेत किंवा स्वतःच्या वापरासाठी ठेवावेत.

**ब. लॉजिस्टीक पार्क (Logistics Park)**

पायाभूत चटई क्षेत्र निर्देशांकासहित किमान 20000 चौरस फुट बांधीव क्षेत्रफळ असलेली लॉजिस्टीक पुरवठा पार्क/इमारत ही लॉजिस्टीक पार्क म्हणून निर्देशित केली जाईल. लॉजिस्टीक पार्क म्हणून अधिसूचित केलेल्या क्षेत्रफळापैकी किमान 80% क्षेत्रफळ हे परिच्छेद 5(अ) मधील नमूद लॉजिस्टीक सेवा पुरविण्यासाठी उपयोगात आणले गेले पाहिजे व उर्वरित 20% क्षेत्रफळ हे मुंबई महानगरपालिका/पुणे महानगरपालिका/ठाणे महानगरपालिका वगळून परिच्छेद 5(क) व 5(ड) मध्ये नमूद व्यापारी/व्यावसायिक सेवा व सामाईक सुविधा पुरविण्यासाठी वापरता येईल. लॉजिस्टीक पार्कांना लागू किंवा 1 चटई क्षेत्र निर्देशांक, ह्यापैकी जो जास्त असेल तो लागू राहील.

उद्योग संचालनालयाने इरादापत्र जारी केल्याच्या दिनांकापासून 3 वर्षांच्या कालावधीत अधिसूचित एकात्मिक लॉजिस्टीक पार्क विकसन पूर्ण होणे आवश्यक आहे. उद्योग संचालनालयाने इरादा पत्र जारी केल्याच्या दिनांकापासून 3 वर्षांच्या कालावधीत लॉजिस्टीक पार्क म्हणून अधिसूचित झालेल्या क्षेत्राचे विकसन पूर्ण होणे आवश्यक आहे. सदर मुदतीत एका वेळी किमान वर्षभर अशी मुदतवाढ कमाल 3 वेळा गुणवत्तेच्या असधारावर देता येईल. सर्व लॉजिस्टीक पार्कसाठी उद्योग संचालनालय हे नोंदणी अभिकरण असतील. इरादापत्र व नोंदणीसाठी अवलंबली जाणारी प्रक्रिया ही माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण 2015 अंतर्गत अनुसरलेल्या प्रक्रियेच्या अनुरुप असेल. लॉजिस्टीक पार्काच्या विकासकाला पायाभूत सुविधा विकसित करून त्यांची देखभाल करावी लागेल. विकासकाने अशा सुविधा भाड्याने/भाडेपट्ट्याने घ्यावेत अथवा द्यावेत किंवा स्वतःच्या वापरासाठी ठेवावेत.

## 8. नियोजन प्राधिकरण

राज्यात एकात्मिक लॉजिस्टीक पार्कच्या विकसनासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे विशेष नियोजन प्राधिकरण असेल.

## 9. उद्योगाचा दर्जा

उद्योगांच्या यशस्वी परिचालनासाठी मजबूत लॉजिस्टीकची गरज लक्षात घेता लॉजिस्टीक क्षेत्राला उद्योगाचा दर्जा देण्यात येईल.

Government of Maharashtra

## 10. एकात्मिक लॉजिस्टीक पार्क / लॉजिस्टीक पार्कसाठी 200% पर्यंत अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक :-

एकात्मिक लॉजिस्टीक पार्क/लॉजिस्टीक पार्कसाठी राज्यात सर्वत्र 1 अथवा अनुज्ञेय असलेला जो जास्त असेल असा मूळ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय असेल. अधिमुल्यासहित किंवा शिवाय लॉजिस्टीक पार्कच्या विकसनासाठी मूळ चटई क्षेत्र निर्देशांकावर 200% अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक खालील प्रमाणे अनुज्ञेय असेल:-

| क्र. | पार्कचे ठिकाण (पीएसआय 2013 मध्ये व्याख्या केल्यानुसार) | अधिमुल्य |
|---|---|---|
| 1. | शून्य उद्योग जिल्हा व नक्षलवादाने प्रभावित विभाग | काही नाही |
| 2. | पुणे, ठाणे, बृहन्मुंबई, कल्याण डोंबिवली, मीरा भायंदर, पनवेल, उल्हासनगर, अंबरनाथ, नवी मुंबई हे महानगरपालिका विभाग, शून्य उद्योग जिल्हा व नक्षलवादाने प्रभावित विभाग यांच्या व्यतिरिक्त | 10% |
| 3. | पुणे, ठाणे, बृहन्मुंबई, कल्याण डोंबिवली, मीरा भायंदर, पनवेल, उल्हासनगर, अंबरनाथ, नवी मुंबई महानगरपालिका विभाग | 15% |

टिप:- तथापि अधिमूल्याची आकारणी विकासकाने अतिरिक्त चटई क्षेत्रासाठी केलेल्या मागणीपर्यंत सिमीत राहील.

## 11. अतिरिक्त जमीन आच्छादन



सेटबॅक व अग्नी सुरक्षा विनियम व प्रचलित चटई क्षेत्र निर्देशांक मानकांच्या अधीन राहून एकात्मिक लॉजिस्टीक पार्कांना एकूण जमिनीच्या क्षेत्राच्या 75% पर्यंत अतिरिक्त जमीन आच्छादित करण्यास परवानगी देण्यात येईल.

## 12. झोन निर्बंधांमध्ये शिथिलता

शेती, उद्योग किंवा व्यापार क्षेत्रासाठी लॉजिस्टीक पार्कची निकड लक्षात घेता लॉजिस्टीक उपक्रम राज्यभरातील सर्व विभागांमध्ये अनुज्ञेय असतील. कृषी व ना- विकास क्षेत्रासाठी अथवा औद्योगिक क्षेत्र वगळून ज्या क्षेत्रामध्ये झोन बदलाची आवश्यकता असेल अशा क्षेत्रामध्ये झोन बदल अधिमूल्याची आकारणी टाऊनशीप धोरणाच्या धर्तीवर रेडीरेकनर दराच्या 15% दराने केली जाईल.

## 13. उंचीच्या निर्बंधांमध्ये शिथिलता:-

एकात्मिक लॉजिस्टीक पार्क/लॉजिस्टीक पार्क यांच्या सुरक्षेच्या गरजांचा विचार केल्यानंतर जागेचा कमाल वापर करण्यासाठी खुल्या आवारांसाठी बहुस्तरीय मांडणीबाबतच्या राष्ट्रीय इमारत संहितेनुसारचा उंचीबाबतच्या तरतुदी शिथिल करण्यात येतील. अग्निशमन विभागाच्या क्षमतेप्रमाणे उपलब्ध रस्ता रुंदी सापेक्ष इमारतीची कमाल उंची 24 मीटर अनुज्ञेय असेल.

लॉजिस्टिक उपक्रम किफायतशीर होण्यासाठी आवश्यकतेनुसार मजल्याची अतिरिक्त उंची मंजूर करताना अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक (FSI) लावण्यात येणार नाही. इमारतीतील प्रत्येक मजल्याची उंची व Staking of Material साठी मजल्यांचे details याबाबत प्रस्ताव मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीसमोर ठेवून कार्यान्वयन आदेश निर्गमित करण्यात येतील.

## 14. औद्योगिक दराने वीज पुरवठा

मंजूर एकात्मिक लॉजिस्टीक पार्क/लॉजिस्टीक पार्कसाठी ह्या धोरणाच्या परिच्छेद 5(क) मधील व्यावसायिक व व्यापारी सुविधांच्या व्यतिरिक्तच्या उपक्रमांसाठी औद्योगिक दराने वीज उपलब्ध करून देण्यात येईल. मंजूर एकात्मिक लॉजिस्टीक पार्क/लॉजिस्टीक पार्कसाठी महाराष्ट्र वीज नियामक कंपनीच्या तरतुदीनुसार Power Distribution Franchises model स्वीकारता येईल. तसेच अपांपारिक ऊर्जा स्त्रोताचा वापर करुन, वीज निर्मीती व वीज वितरण तसेच वीज विक्री संबंधित लॉजिस्टीक पार्क क्षेत्रात करण्याची मुभा असेल. याशिवाय महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (MSEDCL) कडून त्यांच्या अधिनियमातील तरतुदीनुसार अन्य कोणत्याही विद्युत निर्मीती करणाऱ्या कंपनीकडून वीज घेण्याची मुभा संबंधित लॉजिस्टीक पार्कसाठी असेल. तसेच Substation to Switching Station मध्ये access approval देईल. याशिवाय विद्युत ग्राहक तारांमधून Substation Switching Station ला LILO of Power अनुज्ञेय राहील. लॉजिस्टीक पार्क मध्ये 24X7 अखंडरित्या वीज पुरवठा एक्सप्रेस फीडर मार्फत करण्यात येईल.

## 15. निर्णायक पायाभूत पाठबळ

राज्य शासन आवश्यकतेनुसार एकात्मिक लॉजिस्टीक पार्क व लॉजिस्टीक पार्क यांचेसाठी पाणी, वीज, व तिथपर्यंत पोहोच रस्ता अशा पायाभूत सुविधा पुरविण्याची काळजी घेईल. ह्या सुविधा एकात्मिक लॉजिस्टीक पार्क/लॉजिस्टीक पार्कच्या Last mile connectivity पुरविण्यासाठीचे स्त्रोत राज्य शासनाचे उपक्रम असलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र वीज वितरण कंपनी लिमिटेड कडून व पायाभूत सुविधा विकसन निधी योजनेमधून पुरविण्यात येतील.

## 16. सुरक्षा रक्षकांची उपलब्धता

राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या महाराष्ट्र सुरक्षा दलाद्वारे एकात्मिक लॉजिस्टीक पार्क/लॉजिस्टीक पार्कसाठी आवश्यक सुरक्षा व्यवस्था पूर्तता करण्यासाठी सक्रीय सहकार्य करण्यात येईल.

## 17. एक खिडकी योजना

मैत्री ह्या एक खिडकी गुंतवणूकदार सुविधा कक्षाद्वारे लागू असलेले औद्योगिक परवाने देण्याची सुविधा महाराष्ट्र शासन करेल. मैत्रीमध्ये परिवहन विभागाला सुद्धा प्रतिनिधित्व देण्यात येत असून ते प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संधान ठेऊन तक्रारींचे निरसन करतील.

## 18. कामगार कायद्यांमधील बदल

एकात्मिक लॉजिस्टीक पार्कची संकल्पना ही स्वयंचलन व आधुनिकीकरण यावर विशेष भर देत आधारित असल्याने यांत्रिक/स्वयंचलित लॉजिस्टीक सुविधांना अन्य कोणताही कायदा लागू राहणारा नाही.

माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरणाप्रमाणे लॉजिस्टिक पार्क क्षेत्रात देखील 24x7 काम करण्याची मुभा देण्यात येईल.

## 19. कौशल्य विकास

चालक, रोख रक्कम हाताळणारे, सुरक्षा रक्षक इत्यादी कामांमध्ये लोकांना प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र शासन राज्याच्य कौशल्य विकास विभागा सोबत काम करेल. महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ व कै. प्रमोद महाजन कौशल्य विकास योजनेच्या अनुषंगाने शासन रोख रक्कम हाताळणारे, सुरक्षा रक्षक व लॉजिस्टीक करण्यासाठी आवश्यक इतर कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करेल.

Government of Maharashtra

## 20. अस्तित्वातील लॉजिस्टीक सेवेच्या पायाभूत सुविधा अद्ययावत करणे

भिवंडी, पनवेल, तळोजा, नाशिक, औरंगाबाद, तळेगाव नागपूर व इतर ठिकाणी लॉजिस्टीक झोन घोषित करून अस्तित्वातील लॉजिस्टीक सेवेच्या पायाभूत सुविधा अद्ययावत करण्यात येतील.

सद्य: अस्तित्वातील लॉजिस्टीक सेवा देणाऱ्या जागा/इमारती पुनर्विकासाद्वारे सदर उपक्रम सुरु ठेऊ शकतील व स्थानिक स्वराज्य संस्था त्यांच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सुयोग्य बदल करतील.

## 21. केंद्रीय योजनांना प्रोत्साहन

लॉजिस्टीक पार्क क्षेत्रात केंद्र शासनाच्या विविध भागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक ते प्रोत्साहन देण्यासाठी परिणामकारक पाऊले उचलली जातील.

## 22. उच्चाधिकार समिती: एक एकीकृत व समन्वयक हाताळणी

लॉजिस्टीक सेवा क्षेत्राचे यश हे परिवहनाचे विविध पर्याय, कामगारांमधील आवश्यक कौशल्यांची उपलब्धता, जमिनीची व अन्य पायाभूत सुविधांची उपलब्धता यांवर अवलंबून असल्यामुळे रेल्वे व किनाऱ्यावरील वाहतूक खर्च, राष्ट्रीय द्रुतगती महामार्ग, शेवटच्या टोकापर्यंत रस्ते, बहुविध लॉजिस्टीक पार्क, रस्त्यांची देखभाल, तंत्रज्ञानाचा अंगीकार, कौशल्य विकास व उपकरण सेवा ह्यासारख्या क्षेत्रांमध्ये एकीकृत व समन्वित हाताळणी आवश्यक आहे.

ह्यासाठीच मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आंतर विभागीय समितीची स्थापना करण्यात आली असून त्यामध्ये बंदर, महामार्ग व कौशल्य विकास प्राधिकरणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योगांचे प्रतिनिधी यांची समिती गठीत करण्यात आली असून सदर समिती ह्या धोरणाच्या अंमलबजावणीत येणारे अडथळे व आव्हाने यांचा विचार करेल व त्यावर संभाव्य उपाययोजनांचा विचार करून सूचना करेल व त्याच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवेल.

सदर समितीचे खालील प्रमाणे सदस्य असतील

1. अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव (उद्योग)
2. प्रधान सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग)
3. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
4. प्रधान सचिव/सचिव परिवहन)
5. प्रधान सचिव (नगर विकास विभाग (नवि–1)
6. प्रधान सचिव (उर्जा)
7. प्रधान सचिव (कौशल्य विकास)
8. विकास आयुक्त (उद्योग) – सदस्य सचिव

असा कार्यगट बंदरे, रस्ते, विमानतळ, घटलेला टर्नअरावुंड टाईम, तसेच कोरडे बंदर विकास, द्रुतगती महामार्ग निर्मिती, अस्तित्वातील पायाभूत सुविधांची कोंडी काढून टाकणे, माहिती तंत्रज्ञान इत्यादी जाळ्याद्वारे अथ पासून इतिपर्यंत जोडून घेईल.

हीच समिती सदर धोरणाच्या अंमलबजावणी वर देखरेख व संनियंत्रण करेल व जिथे आवश्यक असेल तिथे सर्व प्रक्रिया विकसित करेल. समिती दर सहा महिन्यांनी धोरणाच्या अंमलबजावणीचा आढावा घेईल व काही सुधारणा/दुरुस्त्या/बदल/उपाययोजना करणे आवश्यक असल्यास त्या केल्या जातील.

## 23. परिवहन, कायदा व इतर बाबी सोडविण्यासाठी समिती

अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस व प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकाऱ्यांची एक समिती स्थापन करण्यात येईल व सदर समिती परिवहन, कायदा व इतर बाबीची सोडवणूक करेल.

Government of Maharashtra

## DEPARTMENT OF INDUSTRIES, ENERGY AND LABOR

Government of Maharashtra,
Mantralaya, Mumbai – 400032
Tel.: (91-22) 22025393
**Website: https://www.maharashtra.gov.in/**

## DIRECTORATE OF INDUSTRIES

Government of Maharashtra,
New Administrative Building,
2nd floor, Opp. Mantralaya,
Mumbai – 400032
Tel.: (91-22) 22023584/22028616
**Website: https://di.maharashtra.gov.in/**

## MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION (MIDC)

Udyog Sarathi, Mahakali Caves Road,
Andheri East, Mumbai, Maharashtra 400093
Tel.: (91-22) 26870800
**Website: https://www.midcindia.org/**

## MAHARASHTRA INDUSTRY, TRADE AND INVESTMENT FACILITATION CELL (MAITRI)

“Krupanidhi” Building, 9,
Walchand Hirachand Marg,
Ballard Estate, Mumbai – 400001
Tel.: (91-22) 22622362
**Email id: maitri-mh@gov.in**
**Website: https://maitri.mahaonline.gov.in/**